# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

**Date – 21 January 2026**

**Time 18.10 to 18.20**

**Language Marathi**

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक – २१ जानेवारी २०२६ सायंकाळी ६.१०**

****

- अटल निवृत्ती योजनेला पाच वर्ष मुदतवाढीचा केंद्रीय मंत्रिमंडळाचा निर्णय
- दशकभरापेक्षा कमी कालावधीत महाराष्ट्रात ऊर्जा क्षेत्रात आमुलाग्र बदल– दावोस परिषदेत मुख्यमंत्र्यांचं प्रतिपादन
- जिल्हा परिषदा आणि पंचायत समिती निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज भरण्याची मुदत संपली–उद्या अर्जांची छाननी
- छत्रपती संभाजीनगर इथं गावठी पिस्तुल विक्री प्रकरणी दोन जण ताब्यात

आणि

- प्रजासत्ताक दिन सोहळ्याचा मराठवाड्यातील निमंत्रितांमध्ये उत्साह

****

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली आज झालेल्या केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत अटल निवृत्ती योजनेला आर्थिक वर्ष २०३०–३१ पर्यंत मुदतवाढ देण्याचा महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला. यासोबतच या योजनेच्या प्रचार आणि विकासात्मक उपक्रमांसाठी सरकारकडून दिल्या जाणाऱ्या अर्थसहाय्यात वाढ करण्यालाही मंत्रिमंडळाने मंजुरी दिली आहे. २०१५ मध्ये सुरू झालेली अटल निवृत्ती योजना ही असंघटित क्षेत्रातील कर्मचाऱ्यांसाठी एक महत्त्वाची सामाजिक सुरक्षा योजना आहे. १८ ते ४० वयोगटातील नागरिक या योजनेत सहभागी होऊ शकतात. विकसित भारत या संकल्पनेअंतर्गत, निवृत्तीनंतर असंघटित क्षेत्रातील कर्मचाऱ्यांना आर्थिक सुरक्षितता मिळावी, हा या योजनेचा मुख्य उद्देश आहे. याच बैठकीत भारतीय लघु उद्योग विकास बँक सिडबीला इक्विटीच्या स्वरूपात पाच हजार कोटी रुपयांचे अर्थसहाय्य देण्याचा निर्णयही घेण्यात आला आहे. या

निर्णयामुळे सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांना अधिक बळ मिळण्याची अपेक्षा आहे.

****

भारतानं कोट्यवधी घरं आणि शेतकरी यांना स्वस्त सौर ऊर्जा उपलब्ध करून देण्यात मोठं यश मिळवलं आहे, असं आंतरराष्ट्रीय सौर आघाडीचे महासंचालक आशिष खन्ना यांनी दावोस इथल्या जागतिक आर्थिक मंचाला सांगितलं. सूर्यघर छत योजना १० कोटी घरांपर्यंत पोहोचवण्याचं केंद्र सरकारचं उद्दिष्ट असल्याचं ते म्हणाले. प्रधानमंत्री कुसुम योजनेद्वारे शेतकऱ्यांना सौरऊर्जेच्या माध्यमातून शेती करण्यासाठी सहाय्य्य केलं जातं आणि व्यावहारिक प्रारूप सादर केलं जातं. कमी खर्चामध्ये शेती करण्याच्या दृष्टीनं इतर देश या प्रारूपाचा अवलंब करू शकतात, असं खन्ना म्हणाले.

****

महाराष्ट्राने दशकभरापेक्षा कमी कालावधीत ऊर्जा क्षेत्रात आमुलाग्र बदल घडवून आणल्याचं प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलं आहे.दावोस इथं भरलेल्या जागतिक आर्थिक परिषदेत सौर ऊर्जेसंदर्भात झालेल्या एका परिसंवादात ते बोलत होते.

दरम्यान, तिसऱ्या मुंबईतलं पहिलं शहर म्हणून रायगड-पेण ग्रोथ सेंटरची घोषणा मुख्यमंत्र्यांनी दावोस इथं केली. नवी मुंबई विमानतळापासून सुमारे वीस किलोमीटर अंतरावर हे ग्रोथ सेंटर निर्माण करण्यात येणार आहे. गेल्या तीन-चार वर्षांपासून यासाठीच्या परवानग्या मिळवण्याचा प्रयत्न सुरू होता. त्या मिळाल्यानंतर ही घोषणा करण्यात येत असल्याचं मुख्यमंत्र्यांनी सांगितलं. अनेक गुंतवणूकदारांनी यात गुंतवणूक करण्याची इच्छा व्यक्त केल्याची मुख्यमंत्र्यांनी दिली. ते म्हणाले

**बाईट – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस**

****

कल्याण - डोंबिवली महापालिकेत शिवसेनेला पाठिंबा देण्याचा निर्णय मनसेनं घेतला आहे. कल्याणचे माजी आमदार राजू पाटील यांनी खासदार श्रीकांत शिंदे यांची भेट घेऊन पाठिंबा जाहीर केला. महापौर, उपमहापौर आणि समिती अध्यक्ष पदाच्या संदर्भात एकनाथ शिंदे आणि महायुतीचे वरिष्ठ नेते निर्णय घेतील अशी माहिती खासदार शिंदे यांनी दिली. १२२ सदस्य असलेल्या या महापालिकेत शिवसेनेचे ५३, भाजपाचे ५० तर मनसेचे ५ नगरसेवक आहेत.

****

राज्यातल्या १२ जिल्हा परिषदा आणि १२५ पंचायत समित्यांसाठीच्या निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज भरण्याची मुदत आज संपली. आज अखेरच्या दिवशी अनेक इच्छुकांनी अर्ज भरण्यासाठी मोठी गर्दी केल्याचं चित्र दिसून आलं. उद्या अर्जांची छाननी होईल आणि २७ जानेवारीपर्यंत अर्ज मागे घेता येतील. याच दिवशी मतदान चिन्ह वाटप तसंच अंतिम उमेदवार यादी जाहीर होईल. तीन फेब्रुवारीपर्यंत उमेदवारांना प्रचार करता येईल आणि पाच फेब्रुवारीला सकाळी साडे सात ते संध्याकाळी साडे पाच वाजेदरम्यान मतदान होणार आहे. प्रत्येक मतदाराला जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या गणासाठी प्रत्येकी एक अशी दोन मतं द्यावी लागतील.

****

अकोल्यातील समाजसेवक किसनराव हुंडीवाले हत्याकांडातील १० आरोपींना जिल्हा न्यायालयाने जन्मठेपेची शिक्षा सुनावली आहे, तर पाच जणांची पुराव्या अभावी निर्दोष सुटका झाली आहे. २०१९ मध्ये धर्मदाय आयुक्त कार्यालयामध्ये शिक्षण संस्थेच्या वादातून किसनराव हुंडीवाले यांची हत्या करण्यात आली होती.

****

छत्रपती संभाजीनगर इथं गावठी पिस्तुलाची खरेदी-विक्री करणाऱ्या दोघांना पोलिसांनी ताब्यात घेतलं. दहशतवाद विरोधी पथक गस्तीवर असताना, त्यांना छत्रपती संभाजीनगर ते जालना रोडवरून एक जण पिस्तुल विक्रीसाठी जात असल्याची माहिती मिळाली. त्यानंतर पोलिसांनी गावठी पिस्तुल आणि जिवंत काडतुसांसह दोन जणांना ताब्यात घेतलं.

****

छत्तीसगडच्या गरियाबंद जिल्ह्यात नऊ नक्षलवाद्यांनी आत्मसमर्पण केलं. यातल्या एका महिलेनं जिल्ह्यातल्या इतर नक्षलवाद्यांना शरण येण्याचं आवाहन केलं आहे. जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक वेदव्रत सिरमौर यांनीही नक्षलवाद्यांना आत्मसमर्पण करण्याचं आवाहन करत, समाजाच्या मुख्य प्रवाहात सामील व्हा आणि सरकारच्या पुनर्वसन धोरणाचा लाभ घ्या, असं म्हटलं आहे.

****

७७ व्या प्रजासत्ताक दिनाच्या मुख्य समारंभासाठी नवी दिल्लीच्या कर्तव्य पथावर जय्यत तयारी सुरु आहे. देशाची सैन्य सज्जता आणि पथ संचलन पाहण्यासाठी यंदा

विविध क्षेत्रातील सुमारे दहा हजार विशेष पाहुणे उपस्थित राहणार आहेत. संचलनामध्ये देशाची संस्कृती, लष्करी पराक्रम आणि गौरवशाली वारसा यांचं सादरीकरण होणार आहे. या सोहळ्यासाठी मराठवाड्यातून निमंत्रित करण्यात आलेल्या मान्यवरांमध्ये उत्साह दिसून येत आहे. धाराशिव जिल्ह्याच्या जकेकूरवाडीचे सरपंच अमर सूर्यवंशी यांना आमंत्रित करण्यात आलं आहे. सूर्यवंशी यांनी यासंदर्भात आकाशवाणीला अधिक माहिती दिली. ते म्हणाले..

**बाईट – सरपंच अमर सूर्यवंशी**

महाराष्ट्रातून राष्ट्रीय सेवा योजना एनएसएस च्या चार स्वयंसेवकांनाही या सोहळ्यासाठी दिल्लीला येण्याचं निमंत्रण देण्यात आलं आहे. यामध्ये जालना जिल्ह्यातल्या ताडकळस इथल्या शिवम रामेश्वर सुरडकर या विद्यार्थ्याचा समावेश आहे. हा फक्त आपला वैयक्तिक सन्मान नसून, आपल्या आई-वडिलांचा, गुरूजनांचा आणि संपूर्ण NSS परिवाराचा सन्मान असल्याची भावना शिवम् याने आकाशवाणीशी बोलतांना व्यक्त केली आहे. तो म्हणाला...

**बाईट– शिवम रामेश्वर सुरडकर**

****

गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या ३५० व्या हौतात्म्य सत्संग वर्षानिमित्त येत्या २४ आणि २५ तारखेला नांदेड इथं होणाऱ्या सोहळ्यासाठी `ट्रेन ऑन डिमांड` अंतर्गत मुंबई, चंदीगड आणि दिल्ली इथून २३ आणि २४ तारखेला विशेष रेल्वे गाड्या सोडल्या जाणार आहेत.

दरम्यान, या सोहळ्यानिमित्त लातूर जिल्हा शिक्षण विभागातर्फे'हिंद दी चादर' पथनाट्य स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेत जिल्ह्यातील विविध शाळांमधील ३४ विद्यार्थ्यांनी भाग घेतला.

****

भारतीय जल कार्य संघटना-आयवॉच्या मुंबई केंद्राचं अठ्ठावन्नावं वार्षिक जलअधिवेशन उद्यापासून छत्रपती संभाजीनगर इथं आयोजित करण्यात आलं आहे. पाणीपुरवठामंत्री गुलाबराव पाटील यांच्या हस्ते या अधिवेशनाचं उद्घाटन होईल. शहरातील एमआयटी महाविद्यालयाच्या मंथन सभागृहात होणाऱ्या या तीन दिवसीय अधिवेशनात देशभरातील एक हजार अभियंते सहभागी होणार असल्याची माहिती, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या मुख्य अभियंता तसंच अधिवेशनाच्या अध्यक्षा मनीषा पलांडे यांनी दिली.

****

मराठी भाषा संवर्धन पंधरवड्यानिमित्त बीड इथं बोलींचा जागर अंतर्गत गोरमाटी बोली या विषयावर आज विशेष कार्यक्रम घेण्यात आला. यानिमित्त शहरातून ग्रंथदिंडी आणि शोभा यात्रा काढण्यात आली. यात्रेत विद्यार्थ्यांनी बंजारा वेशभुषा, नृत्य, लोकगीते सादर केली. राज्य भाषा संचालनालयाचा मराठी विभाग आणि के.एस.के. महाविद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने हा कार्यक्रम घेण्यात आला.

****

नाशिक जिल्ह्यात गंगापूर धरण परिसरात उद्यापासून दोन दिवस भव्य एरोबॅटिक शोचं आयोजन करण्यात आलं आहे. भारतीय वायू दल आणि नाशिक जिल्हा प्रशासनाच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या शोदरम्यान भारतीय वायू दलाची प्रसिद्ध सूर्यकिरण एरोबॅटिक टीम आकाशात तिरंगा साकारत प्रेक्षकांना थरारक अनुभव देणार आहे. या प्रात्यक्षिकांसाठी स्वदेशी हॉक एमके-१३२ प्रशिक्षणार्थी विमानांचा वापर करण्यात येणार आहे. स्कॉड्रन लीडर गौरव पटेल यांच्यासह १५ सदस्यांचा सूर्यकिरण चमू या शोमध्ये सहभागी होणार आहे. या कार्यक्रमामुळे तरुणांमध्ये देशभक्तीची भावना अधिक दृढ होईल, असा विश्वास नाशिकचे जिल्हाधिकारी आयुष प्रसाद यांनी व्यक्त केला आहे.

****